भारतीय विद्या भवनचे

# सरदार पटेल अभियांत्रिकी महाविद्यालय

भवन्स कॅम्पस, मुन्शी नगर, अंधेरी (पश्चिम), मुंबई ४०००५८.

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त व्याख्यान

## “व्यासंगप्रिय महामानव” इतिवृत्तांत

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त, आपल्या महाविद्यालयाच्या प्रशिक्षण व आस्थापना विभागाने, **दि. २२ एप्रिल २०१९ रोजी दुपारी ३.०० वाजता,** आपल्या महाविद्यालयातील सेमिनार हॉल ११९ मध्ये, “व्यासंगप्रिय महामानव” या विषयावर, प्रसिद्ध लेखक, इतिहासकार आणि बाबासाहेबांच्या कार्याचे गाढे अभ्यासक श्री. सुहास सोनवणे यांचे व्याख्यान आयोजित केले होते.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांनी बाबासाहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार व फुले अर्पण करून केली.



आपल्या महाविद्यालयाचे प्रशिक्षण व आस्थापना अधिकारी, डॉ. राहुल दहातोंडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.



प्रमुख पाहुणे व मुख्य वक्ते श्री सोनवणे यांची ओळख करून देताना डॉ. दहातोंडे यांनी संगितले की, श्री. सोनावणे यांची डॉ. बाबासाहेबांच्या जीवनकार्यावर, 'शब्दफुलांची संजीवनी', 'ग्रंथकार भीमराव', 'सत्य आग्रही आंबेडकर', 'डॉ. आंबेडकर आणि समकालीन', इ. पुस्तके प्रकाशित झालेली असून विविध वृत्तपत्रांतून लेखन, वृत्त वाहिन्यांवर मुलाखती इ. माध्यमातून त्यांनी बाबासाहेबांच्या कार्याविषयी जनजागृतीचे काम केलेले आहे. बाबासाहेबांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त त्यांनी बाबासाहेबांच्या जीवनातील १२ शिल्पकारांवर आधारित "सचित्र भीमकालदर्शन" ही दिनदर्शिका प्रसिद्ध केली होती.

प्राचार्य डॉ. सावंत यांनी मुख्य वक्त्यांचे स्वागत केले.




कार्यक्रमाला आपल्या महाविद्यालयातील व आपल्या शेजारचे महाविद्यालय, सरदार पटेल तंत्रशास्त्र संस्था येथील, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. भारत सरकारची स्वतंत्र उपक्रम असलेलेली संस्था, **Society for Applied Microwave Electronics Engineering & Research, IIT Campus, Mumbai** येथील, शास्त्रज्ञ श्री. राजेश रंगारी हे देखील या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित होते.





आपल्या व्याख्यानात श्री. सोनावणे यांनी, डॉ. आंबेडकरांच्या आयुष्यातील अनेक प्रसंगांना उजाळा दिला. विशेषता: बाबासाहेबांच्या ज्ञान जिज्ञासेचे त्यांनी उत्तम विवेचन केले. विद्यार्थी आणि शिक्षकांनी बाबासाहेबांच्या कोणत्या गुणांचे अनुकरण करावे याविषयी मार्गदर्शन केले.

“डॉ. आंबेडकरांनी आयुष्यात जे जे कार्य हाती घेतले, ते तडीस नेण्यासाठी आधी त्या कार्याची रूपरेषा आखली, चिंतनातून जे ठरवले, त्यात पुढे तीळमात्रही बदल होऊ दिला नाही. कोणत्याही गोष्टीचे अचूक नियोजन, त्यासाठी चिकाटीने प्रयत्न आणि सखोल व्यासंग हा बाबासाहेबांचा विशेष होता,” असे त्यांनी आपल्या भाषणात नमूद केले. बाबासाहेबांच्या ठायी असलेली चिकाटी, उद्योगशीलता, व्यासंगप्रियता, आणि अदम्य उत्साहामुळे अल्पायुष्यातही त्यांनी विलक्षण स्थित्यंतर घडवून आणले. बाबासाहेबांना अनाथांचा नाथ असे संबोधून त्यांचे स्मरण मुख्य वकत्यांनी आपल्या व्याख्यानात केले.






बाबासाहेबांच्या विविध वैशिष्टयाचे व त्यांच्या जीवन कार्याचे स्मरण या व्याख्यानाच्या निमित्ताने सर्व उपस्थित विद्यार्थी व शिक्षकांना झाले.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ. राहुल दहातोंडे यांनी केले. या कार्यक्रमासाठी संस्थेचे ग्रंथपाल श्री. संजय सावंत व श्री. विणेरकर यांनी विशेष कष्ट घेतले. या कार्यक्रमामुळे बाबासाहेबांच्या जीवनकार्याला उजाळा मिळाला. सर्व उपस्थितांना कार्यक्रम आवडला.

**डॉ. राहुल दहातोंडे**
**प्रशिक्षण व आस्थापना अधिकारी**
**सरदार पटेल अभियांत्रिकी महाविद्यालय, अंधेरी पश्चिम, मुंबई.**